जातो म्हणून ऐतिहासिक संशोधनात प्राथमिक साधनां प्रमाणेच दुय्यम साधनांचेही महत्व असते. एखादे अव्वल दर्जाचे कागदाचे चिटारे सुद्धा ऐतिहासिक घटनांचे मूल्य अर्थ महत्व बदलवून टाकते.

ऐतिहासिक घटना किंवा प्रसंग घडत असतांना त्या व्यक्तीची उपस्थिती घटनेची विश्वसनीयता सांगणारी कागदपत्रे यालाच 'प्राथमिक साधने' असे म्हणतात ही साधने विखुरलेली असतात.

**दुय्यम साधने म्हणजे काय ?**

दुय्यम साधने ही सुद्धा इतिहासकाराला प्राथमिक साधनां इतकीच महत्वाची असतात. दुय्यम साधने म्हणजे एखादी घटना घडत असतांना कुणी पाहीलेली नसते. परंतु त्या नंतरच्या काळात केव्हातरी ती लिहीलेली असते यात लेख, प्रबंध पुस्तक, याचा समावेश असतो. इतिहासाची व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीने दुय्यम साधन महत्वाचे असते. दुय्यम साधने ही प्राथमिक साधनावर अवलंबून असतात. उदा. व्यक्तीचे चरित्र हे दुय्यम साधन आहे. तर 'आत्मचरित्र' हे प्राथमिक साधन आहे.

**संदर्भ साधनांचे वर्गीकरण :** ऐतिहासिक साधनांचे दोन प्रकार आहेत. १) प्राथमिक साधने २) दुय्यम साधने या साधनांमध्ये ढोबळ मानाने लिखीत साधने, अलिखीत साधने असे दोन प्रकार पडतात. **लिखीत साधनांना वाङमयीन साधने** असेही म्हणतात अलिखीत साधनांमध्ये पुरातत्वीय साधनांचाही अंर्तभाव होतो. पुरातत्त्वीय साधनांना **भौतीक साधने** असेही म्हणतात.

**प्राथमिक साधने**

**१) लिखीत साधने**

१) समकालीन कागदपत्रे
२) गुप्त पत्रव्यवहार
३) सार्वजनिक कागदपत्रे
४) वृत्तपत्र
५) आत्मचरीत्र आठवणी
६) सरकारी कागदपत्रे
७) जमा खर्च
८) प्रश्नावली
९) तह किंवा करार
१०) धार्मिक सनदा
११) राजदरबारातील नोंदी

**ब) अलिखीत साधने**

१) भौगोलीक माहीती
२) लोकसाहित्य किंवा जन वाङमय
३) पुराण वस्तु - पुरातत्वीय
४) नाणी
५) शिलालेख
६) चित्र

७) नकाशे

८) दंतकथा

९) हवामान पर्जन्यमान यांच्या नोंदी

**दुय्यम साधने**

१) बखरी

२) शकावली

३) वंशवेल

४) कुळकूटी

५) महजर (करिने)

६) पोथ्या

७) पोवाडे व काव्य

८) ऐतिहासिक म्हणी व वाङ्मय

**लिखीत साधने :**

**१) समकालीन कागदपत्रे :** ऐतिहासीक साधनांमध्ये समकालीन साधने महत्वाची असतात. कोणत्या घटनेचे वर्णन कोणी केले आहे. त्या व्यक्तीचा कालखंड, ती व्यक्ती त्या काळात होती का ? ऐतिहासिक साधनांमध्ये समकालीन लेखनाला जास्त महत्व आहे. घटनेचा साक्षीदार असणे व त्या साक्षीदाराने भाष्य किंवा लेखन करणे हे जास्त विश्वसनीय असते. ऐतिहासिक लेखन करणे ही प्रक्रिया आधुनिक काळात सुरू झाली समकालीन कागदपत्रात पत्रव्यवहार, राज्यकर्त्यांनी केलेल्या सुचना लिखीत स्वरूपात जपून ठेवलेल्या असतात. प्रशासकीय आदेश, सभेचा वृत्तांत आर्थीक ताळेबंद, व्यवहार रोजानिशी खाजगी पत्रव्यवहार संदर्भासाठी व माहितीसाठी जपून ठेवले जातात. हे सर्व शासकीय अभिलेख राज्यव्यवहार व विचारांचे धोरण सांगत असतात.

उदा. युद्धाचे केलेले वर्णन किंवा युद्ध प्रसंग समाजासमोर मांडण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. शिवाजी महाराजांच्या पत्रव्यवहारातुन त्यांची ध्येय धोरणे समजतात समकालीन कागदपत्रे ऐतिहासिक साधनांमध्ये महत्वाची असतात.

**२) गुप्तपत्रव्यवहार :** सरकारी कागदपत्रामध्ये काही कागदपत्रे हा गुप्त दस्तऐवज असतो. सामान्य लोकांचा किंवा जनतेचा या पत्र व्यवहाराशी काहीच संबंध नसे. उदा. लष्करी रणनिती, कटकारस्थाने इत्यादीबावत केलेल्या सुचना.

गुप्तपत्रव्यवहार आणि कागद पत्रांमध्ये प्रामाणिकपणा असणे हा सर्वात महत्वाचा भाग आहे. विश्वसनीयता व हाताखालची माणसे प्रामाणिक असली म्हणजे गोपनियता पाळली जाते. उदा. इ. स. १८५७ च्या उठावाच्या वेळी इंग्रज अधिकाऱ्यांनी इंग्लडमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी गुप्त पत्र व्यवहार केला होता. त्यात ब्रिटीशांची धोरणे स्पष्ट केली आहेत. गुप्तपत्रव्यवहारात सर्वसामान्य माणसाचा संबंध येत नाही.

**३) सार्वजनिक कागदपत्रे** : सार्वजनिक कागदपत्रे ही विश्वसनीयच असतील असे नाही यात दानपत्रे, आठवणी आत्मवृत्ते पत्रव्यवहार, राज्यव्यवहाराची धोरणे निश्चिती करणारी कागदपत्रे इ. सामान्य लोकांना तत्काळ उपलब्ध होतात. थोडक्यात त्यातून राज्यकर्त्यांचे राज्यविचार व व्यवहाराचे धोरण स्पष्ट केले जाते. उदा. व्हिक्टोरीया राणीचा राजीनामा की जो १८५७ च्या उठावानंतर जाहीरपणे सर्वांसाठी मांडण्यात आला.

**४) वृत्तपत्र** : मध्ययुगीन वृत्तपत्राचे स्वरूप बातमी पत्रासारखे होते. एका माणसने दुसऱ्या माणसाला पाठविलेली बातमी / माहिती आजच्यासारखे वृत्त पत्राचे स्वरूप नव्हते. त्यातसुद्धा विश्वसनियता व गोपनियता पाळावी लागे.

उदा. पानिपतच्या युद्धापूर्वी काशिराम पंडीत नानासाहेब पेशव्यांना पत्र पाठवत होते. या ब्रातमीपत्रांमधून तत्कालीन परिस्थिती राज्यकर्त्यांना समजत होती. १९ व्या शतकापासून वृत्तपत्राच्या बाबतीतील विश्वसनीयता कमी होऊ लागली.

**५) आठवणी व आत्मवृत्ते** : फार पूर्वीपासून सरदार मंडळी, राजे लोक, प्रतिष्ठित व्यक्ती आत्मचरीत्र लिहून ठेवीत असत. उदा. - विस्टन चर्चील यांनी लिहून ठेवलेल्या दुसऱ्या महायुद्धातील आठवणी, हिटलरने लिहीलेले आत्मचरीत्र 'माझा लढा' (Main Kamph) तत्कालीन परिस्थितीचे विवेचन त्यात आहे, महात्मा गांधीचे आत्मकथन जागतिक अभ्यासाचा विषय झाला आहे. गोदावरी परुळेकरांच्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या आत्मकथनातून तळागाळातील आदिवासींच्या जीवनाचे चित्र रेखाटले आहे. आत्मचरित्रामधून विशिष्ट कालखंडाची माहिति मिळते. आत्मवृत्त हे जीवनाच्या शेवटी लिहिले जाते.

त्यामुळे काही प्रसंगाची विस्मृती होण्याची शक्यता असते. काही प्रसंगावर भाष्य केले जाते. ते विश्वसनीय असेल असे नाही. काही प्रसंग रेखाटतांना वाङ्मयीन सौदर्याचा मुलामा दिला जातो. हे जरी दोष असले तरी आत्मचरित्र व आठवणी हे उपयुक्त संदर्भ साधन आहे कारण ते समकालीन असते.

**६) सरकारी कागदपत्रे** : सरकारी कागदांचे तीन भाग पडतात.

१) राज्यकारभाराची पत्रे

२) राज्यविचार व व्यवहाराची कागदपत्रे

३) खाजगी पत्रे

राज्यकारभाराची पत्रे त्या काळातील राज्यविचार व व्यवहाराचे धोरण स्पष्ट करतात.

उदा. शिवाजी महाराजांच्या पत्रांमधून व न्याय निवाड्यामधुन त्यांचे गुण दिसून येतात. **समतेविषयी असलेली त्यांची भावना त्यात दिसून येते.** महाराष्ट्रातील वासुदेव शास्त्री खरे यांनी ऐतिहासिक लेख प्रसिद्ध केले. शतपत्रे, ब्रिटिशकालीन पत्रव्यवहार इत्यादी,

सरकारी कागदपत्रांमध्ये खंडणी पत्रे, सनदा रोखे, मुलकी अधिकाऱ्यांचे आदेश इ. समावेश होतो. राजकीय व्यक्ती राज्यकारभार करत असतांना खाजगी पत्रे पाठवित त्या खाजगी पत्रांच्या आदेशाचा लेखनाचा उपयोग त्या काळातील इतिहास समजण्यासाठी होतो. काही बनावट कागदपत्रांचाही धोका असतो. काही पत्रांची नक्कल केलेली असते. त्यात काही शिक्यांची काही बिन शिक्क्यांची असे दोन प्रकार पडतात. 'नक्कल' हा शब्द त्यावेळी वापरत नसत. त्यालाच **'तालीक'** असे म्हणत तालीकेवर राजांचा सही शिक्का नसायचा मूळ पत्रांइतकाच ती अस्सल असायची.

**७) जमाखर्च :** राज्याची आर्थिक स्थिती स्पष्ट करणारे ऐतिहासिक साधन म्हणजे जमाखर्च होय. जमाखर्च, अंदाजपत्रक, ताळेबंद, आर्थिक नियोजन ही कागदपत्रे अस्सल असतात. आणि ती आर्थिक इतिहासासाठी उपयुक्त असतात. राज्याच्या विकासाची ती मोजपट्टी असते. सरकारी जमाखर्चाचा लेखन करणारे हुशार प्रामाणिक व एकनिष्ठ सेवक असावेत या आर्थिक कागदपत्रांमधुन त्या काळातील राजनिती सुद्धा अभ्यासकांना समजते. जमाखर्चातील कागदपत्रांना **तैनात जाबती** असेही म्हणत. या प्रत्येक जाबत्यावर तयार करणाऱ्यांची सही स्थळ तारीख चिन्ह इत्यादीचा उल्लेख असायचा यामुळे ते विश्वसनीय वाटायचे.

**८) प्रश्नावली :** राज्यांची स्थिती समजून घेण्यासाठी लोकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती घेतली जाते आणि या अहवालातून तत्कालीन आर्थिक व सामाजिक परिस्थिती समजते. यालाच **सर्वेक्षण** असेही म्हणतात. ही परंपरा अनेक वर्षापासून प्रत्येक राज्यात चालू आहे.

**९) तह किंवा करार :** तह किंवा करार दोन राज्यांमध्ये निश्चित केलेला असे. तह किंवा धोरण हे लिखित अव्वल साधन आहे. प्राचीन काळापासून राज्याराज्यांमधील झालेल्या तहांना राजमान्यता मिळाल्यामुळे तो एक महत्वपूर्ण ऐवज असतो. तह किंवा करार फक्त युद्धानंतर केले जातात असे नाही. आधुनिक काळात याचे स्वरूप व्यापक बनले आहे. आंतराष्ट्रीय व्यापार, आंतराष्ट्रीय ध्येये, धोरणे, राष्ट्रराष्ट्रातील सहयोग याला विशेष महत्व आले आहे.

उदा. ऐतिहासिक व्हर्सायच्या तहामुळे महायुद्धकालीन परिस्थिती डोळ्यासमोर येते.

शिवाजी महाराजांच्या काळात पुरंदरच्या तहामुळे हिंदवी स्वराज्यावर आलेल्या संकटाची माहिती मिळते. आधुनिक आंतराष्ट्रीय शांतता करारामुळे अनेक युद्धे टाळता आली. तह किंवा करार हा महत्त्वपूर्व शासकीय दस्त ऐवज असतो. गुप्त करार किंवा बोलणी यामुळे विश्वसनीयता पाळली जात नाही. त्यामुळे तह किंवा करार हे उघडपणे करणे आवश्यक असते.

**१०) धार्मिक सनदा :** धार्मिक सनदा हे पण एक लिखीत अव्वल साधन आहे. ही एका अर्थाने राजसत्तेची आज्ञा असते. धार्मिक कार्यासाठी, देवदेवता व मंदिरे याची देखभाल, धार्मिक विधी, विशिष्ट घराण्याकडे सोपविण्याची प्रथा होती व त्याासाठी सेवेचा मोबदला म्हणून रोख स्वरूपात, धनधान्यांच्या स्वरूपात किंवा जमिनीचा तुकडा देऊन वतन दिले जात होते. हे धर्मपंडीत धर्म व संस्कृतीचे रक्षक होते. या 'सनदा' वंश परंपरागत पद्धतीने दिल्या जात होत्या हा यातील दोष वगळता धर्म कार्यासाठी केलेले हे दान महत्व पूर्ण होते. उदा. शिवाजी महाराजांच्या काळात त्यांनी हिंदू मंदिराप्रमाणेच अनेक मशिदींना सुद्धा दान दिल्याच्या नोंदी आहेत. आजही या सनदा अस्तित्वात आहेत.

**११) राजदरबारातील नोंदी :** प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात सुद्धा राजदरबार म्हणजे शासनसंस्था, दैनंदिन राज्यकारभाराची नोंद ठेवत असे. यात सभा, निर्णय, घडामोडी, राज्याच्या सर्व बाबींच्या नोंदी, हालचाली, इ. परिस्थितीचे निरीक्षण केले जात होते. या दरबारी नोंदी विश्वसनीय मानल्या जातात. त्या समकालीन असतात. नोंदी करणारा जबाबदार पदसिद्ध व्यक्ती असतो.

## अलिखीत साधने / (प्राथमिक) :

प्राथमिक साधनांमध्ये अलिखित साधनांनाही महत्वाचे स्थान आहे पुराण वस्तु, नाणी, शिलालेख, चित्र, नकाशे, इमारत, मूर्ती इ. अलिखित साधने इतिहासातील दिपस्तंभा सारखी असतात. ऐतिहासिक काळ संपल्यानंतर या वस्तु अवशेषाच्या माध्यमातून इतिहास बोलका करतात. किल्ले, समाधी, स्मारके, मंदिरे, घाट, इमारती, राजवाडे, मूर्ती हे तत्कालीन इतिहास अभ्यासकाला सांगत असतात. ही साधने अपूर्ण असली तरी लिखीत साधनांना पूरक ठरतात. लिखीत साधनातील त्रूटी पूर्ण करण्याचे काम ही साधने करत असतात.

**१) भौगोलिक माहिती :** भौगोलिक परिस्थितीत काळानुरूप फारसा फरक पडत नाही. प्रवासाचे मार्ग, नद्या, नाले. डोंगरभाग. इत्यादी भौगोलिक परिस्थिती इतिहास सांगत असते. उदा. भौगोलिक परिस्थितीमुळे इतिहासात अनेक घटना घडून गेलेल्या आहेत. उदा. पानिपतचे युद्ध, मराठ्यांना सपाट मैदानावरील रणनितीचे ज्ञान नसल्यामुळे त्यांचा पराभव झाला. रशियातल्या अतिथंडीमुळे नेपालियन बोनापार्टचा पराभव झाला. एक एक किल्ला हा त्या राज्याचा रक्षणकर्ता म्हणूनच ठरला. ऐतिहासिक प्रसंग लिहीत असतांना भूगोलाचे ज्ञान असणे आवश्यक असते.

**२) लोकसाहित्य किंवा जनवाङःमय :** काही समाजाने परंपरेने मौखिक साहित्याची निर्मिती केली आहे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक स्वरूपात हे साहित्य जतन करून ग्रामीण भागातील आदिवासी भागातील स्थानिक बोलीभाषेतील काही काव्ये, म्हणी, कथा इतिहास लेखनाला उपयुक्त ठरतात. या साहित्यामध्ये बदल होत राहतो. नावांची भर पडते. फेरबदल होतात. कधी-कधी अर्थही बदलतात. मात्र इतिहासकाराला मार्ग दाखविण्याचे काम हे साहित्य करत असते. लोकवाङमयामध्ये जी साहित्य निर्मीती असते ती सामान्य लोकांना आलेली अनुभुती असते. तो त्याच्या आत्याच्या हुंकार असतो.

**३) पुराण वस्तु, पुरातत्वीय :** ही इतिहास लेखनाची अलिखीत पण महत्वपूर्ण प्राथमिक साधने आहेत. यात काही प्रकाशित काही अप्रकाशित साधनेही असतात. थोडक्यात या पुराण वस्तु म्हणजे गतकालीन इतिहासाच्या पाऊलखुणा असतात. त्या सातत्याने प्रेरणा देत असतात. किल्ले, राजवाडे, काही ऐतिहासिक अवशेष मूर्ती, उदा. सिंधु संस्कृतीचा, हडप्पा संस्कृतीचा असाच १९२१ मध्ये शोध लागला. उत्खननामध्ये सापडलेल्या या पुराण वस्तुंमुळे एक समृद्ध अशी वैभवशाली संस्कृती उजेडात आली. उदा. दायमाबाद येथे काही नव्याने अवशेष सापडले. औरंगाबाद येथे काही अवशेष सापडले. नाशिक येथील गोदापात्रात सापडलेल्या काही अवशेषामुळे नाशिकचा इतिहास प्राचीन काळाशी जोडला गेला. इतिहासाचा शोध घेतांना पुरातत्त्वीय साधने उत्खननाच्या माध्यमातुन सापडतात त्याच बरोबर काही अवशेष दिर्घ काळ जतन करून ठेवले जातात. ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय या कामी महत्वपूर्ण भुमिका बजावतात. मराठ्यांच्या सत्तेचा इ.स. १८१८ मध्ये ऱ्हास झाला पुणे, शिवनेरी, रायगड - पन्हाळा किल्ला इतिहास बोलका करण्याचे काम करतो,

कुतुबमिनार, ताजमहल, मुघल सम्राट शहाजहानच्या काळातील सुवर्ण युग सांगत असतो. पुराणवस्तु ह्या तत्कालीन समाजव्यवस्थेच्या विकासाच्या प्रगतीची एक मोजपट्टी असते. ब्रिटीश काळामध्ये पुरातत्वीय संशोधन खाते निर्माण झाले. ते पुराणवस्तु जतन करने, वस्तुसंग्रहालय यांची देखरेख करू लागले यातून नवी जाणीव व नवी दृष्टी भारतीयांना मिळाली.

**४) नाणी :** नाणी हे इतिहास लेखनाचे महत्वपूर्ण अविनाशी साधन आहे नाणी व मुद्रा शोधांमुळे पुराण वस्तू संस्थांची निर्मिती झालेली आहे. नाण्यांवर असलेल्या प्रतिकृतीमुळे चित्रांमुळे आपल्याला त्या काळातील संस्कृतीची ओळख होते. आर्थिक इतिहासाची माहिती होण्यास मदत होते. राज्याची सीमा, व्यापार, चलन व्यवस्था इ. माहिती मिळते. काही नाण्यांचे वाचनही करता येते.

उदा. शिवराई, अच्च्युतराईची, होन ही शिवकालीन नाणी.

वा. सी. बेंद्रे म्हणतात, नाणी बनावट आहेत किंवा कसे हे ओळखण्याचा मुख्य मार्ग म्हणजे ती शुद्ध आहेत किंवा नाही व त्यावरील उल्लेख ऐतिहासिक माहितीला धरून आहे किंवा नाही हे तपासणे गरजेचे आहे. आधुनिक काळात नाणकशास्त्र हा स्वतंत्र विषय आहे. नाणी सोने, चांदी, व इतर मिश्र धातूंची असतात. नाण्यांवरील राजा व राज्यांची नाव व चिन्हे. यावरून आपल्याला त्या राज्याची माहिती मिळते घटनाक्रम व कालक्रमसुद्धा ठरविता येतो. ग्रीक आक्रमणानंतर भारतीय राजे आपले नाव नाण्यावर कोरू लागले. विविध काळातील कलांचा विकासही नाण्यांमुळे आपल्याला दिसून येतो. समुद्रगुप्ताचे वीणा वादन करत असल्याचे नाणे - त्याच्या कलेची साक्ष देते. उदा. भारतामध्ये जी रोमन नाणी उपलब्ध झाली. त्या नाण्यांवरून भारत व रोम यांचा व्यापार फार काळापासून चालू होता असे अनुमान काढता येते.

**५) शिलालेख :** आधुनिक काळात शिलालेखशास्त्र विकसीत झाले आहे. या शास्त्राचा भाषाशास्त्र व हस्ताक्षर शास्त्र यांच्याशी जवळचा संबंध आहे. शिलालेख हे इतिहासातील अलिखीत व प्राथमिक साधन आहे. शिलालेख हे किल्ले राजवाडे, देवालय, वाडे, कबरी, मशीदी, चर्च इ. ऐतिहासिक वास्तुमध्ये दिसून येतात. शिलालेख लेखन करणारी विशिष्ट अशी एकच व्यक्ती असेल असे सांगता येणार नाही. शिलालेख थोडक्यात पण समर्पक अशी संक्षिप्त रूपे घेऊन लिहीलेले असते.

शिलालेखाचे वाचन करणे ही महत्वाची बाब आहे. शिलालेखाची विश्वसनीयता तपासून पाहणे ही एक मुख्य अडचण असते. कधी-कधी

इतिहासातील विकृतीमुळे खोट्या शिलालेखाचा प्रश्न निर्माण होतो. शिलालेखाची भाषा संशोधकाला समजते का ? हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. उदा. जुन्नर जवळील नाणेघाटातील शिलालेखामुळे आपल्याला सात वाहनांच्या कारकींदीवर प्रकाश टाकता येतो. प्रो. रेनियर म्हणतात. ऐतिहासिक घटनांचा शोध लावण्यासाठी संशोधकाला पुरावे ज्या भाषेत लिहीले आहेत. तिची सखोल माहिती असणे आवश्यक आहे'' शिलालेख लिहीत असतांना ज्या संक्षिप्त रूपाचा वापर केला आहे. ती पद्धती माहिती असणे आवश्यक आहे.

उदा. पांडव लेण्यामधील शिलालेखामुळे नाशिक परिसरातील प्राचीनकाळची माहीती मिळते. शिलालेखाचा अभ्यास करत असतांना शिलालेखाचा कालखंड, त्याची भाषा, उपलब्ध असल्याचे स्थळ, हस्ताक्षर या बाबींचे सखोल ज्ञान झाल्यानंतर संशोधकाला, विश्वसनीयता पटल्यावर त्याला इतर साधनांमधुन ती माहिती पडताळून पाहवी लागते.

**६) चित्रे :** प्राचीन काळी चित्रलिपी होती. चित्रकार हा शिक्षीत असला पाहिजे असे बंधन नसते. तो त्याच्या प्रतिभेचा अविष्कार असतो. प्रारंभी मानव निसर्गाशी एकरूप असल्यामुळे निसर्ग चित्राचा उदय झाला. त्यानंतर चित्रशैलीवर धर्मशास्त्राचा प्रभाव निर्माण झाला. भारतात प्राचीन काळापासून चित्रकला प्रगत असल्यामुळे कोरीव मुर्ती, लोणी, स्तंभ, मंदीरे, इतिहासाची साक्ष देतात. उदा. मथुरा चित्रशैली, जयपूर, चित्रशैली, कांगडा चित्रशैली, पेशवेकालीन चित्रशैली मध्ययुगामध्ये चित्रकलेला राज्यश्रय मिळाल्यामुळे तिचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आणि चित्रकलेमध्ये अनेक संप्रदाय निर्माण झाले. काही परकीय चित्रशैलीचाही भारतीय चित्रशैलीवर परिणाम झाला माणसप्रमाणेच देव, दानव, जनावरे यांची चित्रे निर्माण झाली. पुढे राज्याची, सरदारांची चित्रे काढली जाऊ लागली. उदा. काचेवरील चित्रे मराठ्यांच्या कालखंडात विशेष प्रसिद्ध होती. यावर चिनी आणि इराणी चित्रशैलीचा प्रभाव होता महाराष्ट्रात भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे येथे मोठ्या प्रमाणावर अशा चित्रांचा संग्रह आहे. चित्रकलेमुळे व्यक्ती पूजा, विभुती पुजा सुरू झाली चित्रकलेने भारताच्या सांस्कृतीक इतिहासात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच भारताच्या सांस्कृतीत इतिहासात वैभवाची भर टाकली आहे. अजिंठा येथील चित्रशैली परदेशी पर्यटकांचा अभ्यासाचा विषय ठरली आहे.

वारली आदिवासींनी विकसीत केलेली चित्रशैली परदेशात जाऊन पोहचली आहे.

**७) नकाशे** - नकाशा शास्त्र उशिरा विकसीत झाले. मानवी जीवनप्रणाली स्थिर झाल्यानंतर कृषिप्रधान समाजव्यवस्थेत जमिनीची मोजणी, राज्याचा नकाशा महत्वांच्या स्थळांचा उल्लेख नकाशात विशिष्ट खुणा करून करणे सुरू झाले प्रारंभीचे नकाशे 100% विश्वसनीय होते असे मानता येत नाही. भारतात येणाऱ्या परकीय प्रवाशांनी नकाशे काढले आहेत. त्यामुळे ते फक्त दिशांचे उल्लेख करत होते अंतराचा उल्लेख नसायचा. आधुनिक काळात मात्र पाश्चिमात्य विज्ञानाचा प्रभाव निर्माण झाल्यानंतर शास्त्रशुद्ध पद्धतीने नकाशा काढण्याची प्रक्रिया सुरू झाली नकाशा शास्त्राचा विकास झाला. भौगोलिक व ऐतिहासिक माहिती अचुकपणे सांगणारे महत्वाचे साधन म्हणजे नकाशांचे प्रमाणित नकाशे आणि अप्रमाणित नकाशे असे दोन प्रकार पडतात. नकाशाच्या खाली तयार करणाऱ्या संस्थेचे नाव, स्केल, दिशा इत्यादीचा स्पष्ट उल्लेख असेल तर ते प्राथमिक साधन ठरते, भूमातेची रचना व स्वरूप सांगणारे हे शास्त्र आहे. या शास्त्राने आता अवकाश युगात प्रवेश केला आहे.

**८) दंतकथा / आख्यायिका** : या अलिखीत असतात त्यांना आधार नसतो विश्वसनीय नसतात. मात्र घटना स्पष्ट करण्यासाठी जादा माहिती देण्यासाठी उपयोगी पडतात. त्यांना प्राथमिक साधनाचा दर्जा दिला जात नाही.

**९) हवामान / पर्जन्यमान याबाबतीतल्या नोंदी** : या बाबी काही वेळा लिखित असतात. काही ठोकताळे असतात. थोडक्यात कल्पना असतात. म्हणून दिशा, परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी उपयुक्त असतात. आधुनिक काळातील नोंदी लिखीत व प्राथमिक साधने आहेत.

## दुय्यम साधनांचे प्रकार -

दुय्यम साधने ही प्रामुख्याने प्राथमिक साधनांवर अवलंबून असतात आणि दुय्यम साधने ही प्राथमिक साधनां इतकीच महत्त्वाची आहेत. प्राथमिक साधने ही अस्सल आणि अर्थपूर्ण असतात, तर दुय्यम साधने ही अनेकदा प्राथमिक साधनांनवरूनच लिहीलेली असतात.

उदा. पुस्तके, माहिती, संकलित लेख हे दुय्यम साधन म्हणून ओळखले जाते. दुय्यम साधनांतील माहिती ही एखादया मुद्द्यावर विशेष भर देणारी समकालीन प्रश्न समजावून देणारी असते. दुय्यम साधनांमध्ये असलेली उपयुक्त माहिती ही अवतरणचिन्ह देऊन आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी वापरता येते. इतिहासाच्या संशोधकांनी मांडलेली एखादी सैद्धांतिक कल्पना पडताळून पाहण्यासाठी किंवा एखादया गोष्टीचा अन्वयार्थ लावण्यासाठी अशा

दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग त्यांना काही ठिकाणी करता येतो, पण ही साधने १००% संपूर्ण खरी आहेत हे मानने योग्य होणार नाही. कारण या साधनांचा वर्ग हाच मुळात दुय्यम घटक आहे. दुय्यम संदर्भ साधनांचे प्रकार पुढीलप्रमाणे -

**१) बखरी - ऐतिहासिक खबरींचे संकलन करून मराठी काळात जे ग्रंथ निर्माण झाले त्यांना बखरी असे म्हणतात.** बखर वाङ्मय हे अनेक अर्थाने इतिहासात फार प्रसिद्ध आहेत. काही बखरी साहित्यगुणांनी प्रसिद्ध आहेत, तर काही विशिष्ट माहितीसाठी प्रसिद्ध आहेत. बखरींमधील सगळी माहिती सत्य घडलेली आहे असे ठामपणे सांगता येत नाही, पण त्याचबरोबर सर्व माहिती मनोरंजन किंवा भंप्पक आहे असे म्हणणे योग्य नाही. बखरी या निश्चितपणे विश्वसनीय आहेत, पण त्या विश्वसनियतेला एक निश्चित मर्यादा आहेत. कारण बखरींचे लिखाण हे घटना घडून गेल्यानंतर बराच कालाखंड गेल्यावर झालेले असते. बखरीत येणारा मजकूर हा अनेक मार्गाने मिळविलेला असतो. समाजातील लोकांचे एखादया घटनेबद्दलचे मत, विशिष्ट हेतू, लोककथा, बाजारगप्पा यांचा नाही म्हटला तरी बखरीवर प्रभाव असतो. लेखकाला पटेल असाच मजकूर त्यातून घेतो. बखरकार हा नेहमी आपले पात्र किंवा व्यक्तीरेखा बळकट आणि प्रभावशाली, गौरवास पात्र व्हावी यासाठी त्याच्या पराक्रमाची गाथा गात राहतो. स्वरचित संभाषण किंवा काही काल्पनिक पात्र बखरीत घातलेले असतात. बखर वाङ्मयाला लोकाश्रय मिळावा हा हेतू त्यात असतो. यामुळे बखरींचे लिखाण हे चिकित्सापूर्व बुद्धीने केले जात आहे हे म्हणणे धाडसाचे होईल. यावरून बखरी जरी ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने विश्वसनीय नसल्या तरी बखरीतील व्यक्ती रेखावरून त्यावेळेला नेमका कोणता प्रसंग घडला याचा अंदाज करता येतो. यामुळे काही दोष वगळले तरी बखरी या इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे असेच आपल्याला म्हणावे लागेल.

**२) कुळांचा इतिहास - कुळांचा इतिहास म्हणजे 'कुळकट्टी' एखादया कुळाचा इतिहास लिहिण्याची प्रथा फार जुनी आहे.**

उदा. 'भट्ट' कुळांचा इतिहास, 'लेले' घराण्यांचा इतिहास, एकाच पिढीत घडलेल्या गोष्टी त्या पिढीने लिहून दुसऱ्या पिढीने त्यात भर टाकणे यातून कुळांचा इतिहास तयार होतात.

आपला वंश विस्तार कसा झाला, नातेसंबंध कसे निर्माण झाले याचे वर्णन त्यात असते. या कागदपत्रांचा उपयोग कौटुंबिक कामासाठी होतो. त्याचबरोबर

काही विषय संदर्भ हवे असल्यास त्याचा उपयोग संशोधकाला होतो. कुळांचा इतिहास किंवा कुलवृत्तांतामुळे एखाद्या कुटुंबाचा उगम, विकास, वेळ प्रसगी घसरण कोणत्या कारणामुळे झाली याचा अंदाज येतो. या कुळाच्या इतिहासात प्रत्येक व्यक्तींची माहिती दिली जाते. जन्म, मृत्यु नोंद असते. काहीत ती नसते. अनेकवेळा आजोबांचे नाव नातवाला दिलेले असते. त्यामुळे नावांचा गोंधळ होतो. धार्मिक कृत्य करताना गोत्र, प्रभर वगैरे माहितीसाठी कुळांचा इतिहास मोठी मदत करतो. कुळांचा इतिहास हा अधिकृत मानण्यास हरकत नसावी. कारण तो इतिहास हा त्या संबंधीत कुळातील माणसांनी लिहून घेतलेला असतो.

**३) वंशवेल - यामध्ये एखाद्या डेरेदार वृक्षाचे चित्र काढून त्या वृक्षांच्या फांद्यावर अनेकांची नावे लिहलेली असतात. असे अनेक वेगवेगळ्या कुळांचे वंशवेल आपल्याला सापडतात.** या वंशवेलावरून कोणाचा कोण हे लक्षात येते. त्याचबरोबर त्या कुळाचे कोणत्या घराशी कुटुंबियांशी नातेसंबंध कसे प्रस्थापित झाले याचा स्पष्ट खुलासा होतो. वंशवेल जर वृक्षाचे चित्र न काढता माहिती देणारी असेल तर ती माहिती लिहण्याचा क्रम डावीकडून उजवीकडे असतो. वंशवेल लिहताना नेहमी त्याची सुरूवात 'ब्रम्हदेवापासून' करतात. नंतर प्रत्येक व्यक्तीची माहिती दिलेली असते. धार्मिक कृत्य करण्यास त्याचा उपयोग होतो.

**४) बाडे - एखादया कुटुंबाची हस्तलिखित स्वरूपात जेव्हा माहिती लिहून ठेवली जाते किंवा काही निवडक ऐतिहासिक प्रसंगाची नोंद केली जाते, तिथी, शक यांची नोंद करणे, लग्न कार्य, मुंज या धार्मिक कार्याची नोंद खर्चासकट लिहून ठेवणे याला 'बाड' असे म्हटले जाते.** काही वेळा या बाडामध्येच वनऔषधी, मंत्रतंत्र आणि काही विशिष्ट प्रसंगाचे वर्णन असते. मजकुरात विशिष्ट प्रसंगाचे वर्णन असते. मजकुराचे विशेषीकरण त्यात नसते. या साधनाचा दर्जा अर्थातच दुय्यम असतो.

**५) महजर, करीने, तकरीरा** - महजर करीने, तकरीरा ही साधने न्याय मिळविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. या साधनांतून काही पुरावा मिळेल असे सांगता येत नाही. यातील मजकूर अनेक वर्षांची माहिती देऊ शकतो. या मजकूरातून अव्वल दर्जाची माहिती मिळेलच असे सांगता येत नाही. **महजर हे विशेषकरून न्यायनिवाड्याचे असे कागदपत्र असतात.** यात दोन्ही पक्षाच्या मतांची नोंद करून ठेवलेली असते. जमिनीच्या मालकी हक्काबद्दल, वतनाबद्दल त्यात माहिती मिळते. **करीने म्हणजे जमिनीच्या मालकीबद्दल व वतनाबद्दलची**

**कागदपत्रे होय व तकरीरा म्हणजे न्याय मिळविण्यासाठी दिलेल्या तक्रारीची कागदपत्रे होय.**

**६) शकावल्या - एखादे घराणे किंवा राजकीय कुटुंब किंवा व्यक्ती यांचे चरित्र्य सांगणारे साधन म्हणजे शकावली होय.** शकावल्यांमध्ये विविध प्रसंगाचे वर्णन असते. पण त्यातील कालनिर्देश हा अत्यंत अचूक असतो. शकावल्यात दोन प्रकार आहेत.

त्यापैकी एका भागावर पौराणिक परंपरेचा प्रभाव पडलेला आहे, तर दुसऱ्या प्रकारच्या शकावल्यांमध्ये राजकीय घडामोडींचा उल्लेख दिसून येतो. शकावल्यांमध्ये रोजच्या खर्चापासून ते राजव्यवस्थेपर्यंतचा उल्लेख असतो. त्यातील माहिती ही इतिहास लेखनास उपयुक्त पडण्यासाठी तकरीरा किंवा करीने यांच्याशी तुलना करून पहावी लागते.

**७) पोवाडे व काव्ये - एखादया ऐतिहासिक घटनेचे वीररस युक्त, स्फूर्ती व प्रेरणादायी वर्णनपर काव्य म्हणजे ''पोवाडा'' होय.** इतिहासाचे संदर्भ साधन म्हणून पोवाडे हे सुद्धा एक महत्त्वाचे साधन ठरते. पोवाडे हे जरी वीरसप्रधान असले तरी त्यातील वर्णन हे बरेचसे ऐतिहासिक सत्याला धरून असल्यामुळे एक साधन या दृष्टीने त्यांचा मोठा आधार मानायला हरकत नाही. पोवाड्यांची जोपासना बहुतेक वेळा परंपरेने होत असते. क्वचित प्रसंगी ते लिहून ठेवलेली असतात. पोवाडे गाणारे हे शाहीर बऱ्याच वेळा निरक्षर असल्यामुळे ते लिखित स्वरूपाचे असण्याऐवजी तोंडी स्वरूपाचे असल्याचे दिसून येतात. पोवाड्यांची चाल अत्यंत सुलभ, सोपी असते की त्यात समयसूचकते नुसार बदल आणता येतो. पोवाड्यांची जपणूक परंपरेने होत असल्याने अनेकदा कडवीच्या कडवी विसरल्या जावून शाहीर स्वतः तयार केलेली कडवी घुसडून देत असतो. यामुळे पोवाड्यांची विश्वासर्यता कमी होते आणि ते इतिहासाचे दुय्यम साधन बनते.

काव्य हे सुद्धा इतिहासाचे साधन आहे. ऐतिहासिक प्रसंगावरील काव्ये ही अत्यंत कमी आहेत. या काव्य रचनेवरून एखाद्या घटनेचे ज्ञान होते. यामुळे ऐतिहासिक साधन म्हणून काव्य दुय्यम दर्जाची ठरतात.

**४) खंडकाव्ये** - खंडकाव्य हा काव्याचाच एका मोठ्या प्रमाणात सादर केलेला भाग होय.

काही खंड काव्यात राजाच्या जन्मपासून मृत्युपर्यंत त्याच्या जीवनाचा आढावा घेतलेला असतो. तर काही खंडात एखाद्या दिर्घकाळ चाललेल्या

युद्धाबद्दल माहिती दिलेली असते. खंडकाव्य लिहणारा कवी प्रतिभा संपन्न असावा लागतो. राजाश्रय मिळालेल्या कवींनी फार मोठी मोलाची भर खंड काव्याच्या विकासासाठी टाकलेली आहे.

**ऐतिहासिक म्हणी आणि वाङ्मय** - एखादा विशिष्ट प्रसंग लोकांच्या मनावर चांगलाच परिणाम घडवून आणू शकतो. या प्रसंगातून एखादी म्हण अस्तित्वात येते, परंतु त्या म्हणीला भाषा व संप्रदाय यांचे मर्यादित स्थान असते. एखाद्या व्यक्तीवरून आलेल्या म्हणी या जास्त काळ टिकतात. एखादी म्हण एखाद्या गावापुरतीच मर्यादित राहते. काही ऐतिहासिक म्हणी पुढीलप्रमाणे-

उदा. **'होता जिवा म्हणून वाचला शिवा', 'गड आला पण सिंह गेला', 'बचेंगे तो और भी लढेंगे'** व्यक्तीमधल्या वैशिष्ट्यानुसार ही शब्द प्रयोग अस्तित्वात आले आहेत. उदा. सुर्याजी पिसाळ हे नाव फंद फितुरीशी जोडले गेले.

ऐतिहासिक वाङमय हे साधारणतः राजकीय व सामाजिक परिस्थितीची माहिती सांगणारे असते. ऐतिहासिक घटना त्यातून आपल्याला शोधता येतात. काही वेळेला त्यात अतिरंजितता व अतिमानवीकरण दिसते. त्यामुळे त्यातून काही शुद्ध अस्सल मिळेल असे म्हणणे धाडसाचे ठरते. एक मात्र खरे की, ऐतिहासिक वाङ्मय हे बऱ्याच वेळा एखाद्या विशिष्ट कालखंडातील समाजाचे विविध अंगातून दर्शन घडविण्यास उपयुक्त ठरते.

## ३.२ साधनांची उपलब्धता :

साधनांशिवाय इतिहास नाही. संदर्भ साधनां शिवाय ऐतिहासिकता आणि त्यातील वस्तुनिष्ठता स्पष्ट होत नाही. इतिहास लेखनात साधने उपलब्ध होणे. ती कोठे उपलब्ध होतील याची माहिती मिळविणे. थोडक्यात साधने गोळा करणे. नंतर त्यांचा अभ्यास करणे हा ऐतिहासिक संशोधनातील महत्त्वपूर्ण टप्पा आहे. संशोधन साधनांचा अव्वलपणा, वस्तुनिष्ठता, कालखंड हा संशोधनातील महत्त्वाचा धागा असतो. या धाग्यांच्या गुफंनातून ऐतिहासिक लेखनाची जुळणी होत असते. पुरावे व साधने ह्यांचा इतिहास लेखनासाठी कच्च्या मालासारखा उपयोग होतो. इमारतीची रचना करण्यासाठी ज्याप्रमाणे आराखडा, बांध कामासाठी दगड, विटा, माती, चुना, सिमेंट, लोखंड, पाणी, लाकूड इ. साहित्याची गरज असते. त्याचप्रमाणे ऐतिहासीक साधनांची गरज महत्त्वपुर्ण आहे. उत्तम गृहिणीसाठी जसे तेल तुप, भाज्या मसाले यांची गरज असते त्याचप्रमाणे इतिहास लेखनासाठी पुरावे, साधने जमा करावी लागतात.

थोडक्यात जेवढा गुळ घातला तेवढे गोड होते. याप्रमाणे ऐतिहासिक लेखनात शास्त्रशुद्ध पद्धती आली, साधनांचे महत्त्व पटले. साधने संग्रहीत ठेवून त्यांची देखभाल करावी लागते. या पश्चिमात्य दृष्टीकोनातून एक चळवळ उभी राहिली त्यातून अभिलेखागार, दप्तरखाने या संकल्पनेचा विकास झाला.

दप्तरखाने म्हणजे ज्या मध्ये सरकारी तसेच खाजगी किंवा वैयक्तिक स्वरूपाचे इतिहासाचे पुरावे अथवा कागदपत्रे अत्यंत व्यवस्थित व काळजीपूर्वकरीत्या जतन करण्यात येतात. त्याला **'अभिलेखागार'** असे म्हटले जाते. यामध्ये इतिहासाची साधने किंवा पुरावे याचे जतन व त्याची जोपासना एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून केली जाते.

ग्रीक रोमन काळापासून साधनांची देखभाल व त्यांची जपवणूक करणे ही परंपरा युरोपात अस्तित्वात होती. युरोपीय समाजामध्ये इतिहासा विषयीची जाण व महत्त्व ही जाणीव प्रथम पासूनच होती. इ. स. ११९९ पासून इंग्लंडमध्ये महत्त्वाची सरकारी कागदपत्रे, दप्तरे जतन करून ठेवले जात होते. इंग्लंडमध्येच 'सरकारी दप्तरखाने' हया संस्थेचा पाया घातला गेला. सरकारी दप्तरखाने ही संकल्पना तेव्हा पासून निर्माण झाली. केंद्रीय दप्तर खानाचा उदयही या घटनेतूनच झाला. कागदपत्रे, साधनांचे जतन आणि देखरेख ही दोन्ही कामे अत्यंत निष्काळजीपणे केली जात होती. त्यामुळे कागदपत्राचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होवू लागले. अनेकदा राजकीय वैमनस्यातून किंवा अन्य खाजगी वैयक्तिक कारणामुळे ही कागदपत्रे नष्ट करून टाकली जात. १९ व्या शतकांत क्रांतीकारक बदल होवून दप्तर खान्याची देखभाल व जतन पद्‌धतशीरपणे येऊ लागले. जे घडले तेच नेमके कळावे. यासाठी कागदपत्रे व पुरावे व्यवस्थित असावे लागतात. ब्रिटीश संसदेने इ. स. १९८३ मध्ये **'दि पब्लिक रेकॉर्डस ऑफीस'** सुरू करण्यासंबंधी कायदा करण्यात आला. यापासून प्रेरणा घेऊन युरोपात मोठ्या प्रमाणावर विविध देशात दप्तरखाने सुरू झालेत. ब्रिटीश राजवट असलेल्या आशिया-आफ्रिका राष्ट्रांमध्ये ही दप्तरखाने स्थापन करण्याची प्रक्रिया इ. स. १९४७ ते १९७० या काळात प्रभावीपणे सुरू झाली. त्या राष्ट्रांनी युरोपच्या धर्तीवर आपापली अभिलेखागार सुरू केला. भूतकाळातील तसेच वसाहतवादाच्या काळातील सर्व कागदपत्रे इतिहासकारांना उपलब्ध करून देण्यात आली. या देशातील इतिहासाचे लेखन करण्यासाठी अभिलेखागाराची पायाभरणी करण्यात आली. ब्रिटीशांनी वसाहतीची कागदपत्रे योग्य रितीने जतन करून ठेवली आहेत. वसाहती काळातील सर्व कागदपत्रे

अभ्यासकांना उपलब्ध करून दिल्याने इतिहास लेखन करण्यास संशोधकांना व अभ्यासकांना चालना व प्रेरणा मिळाली. इ.स. १७५३ पासून ब्रिटीश वस्तुसंग्रहालय स्थापण्यात आले व त्याच्याकडे असे दप्तर देण्यात आलेले आहे. इ. स. १९७५ मध्ये अमेरिकेत माहिती मिळविण्याच्या स्वातंत्र्याचा कायदा मंजूर करण्यात आला. असून तेथील नागरिकांना सर्व प्रकारची माहिती मिळविण्याच्या स्वातंत्र्याचा कायदा मंजूर करण्यात आलेला असून तेथील नागरिकांना सर्व प्रकारची माहिती आता अगदी सहजरित्या उपलब्ध होवू शकते. आंतरराष्ट्रीय पातळीवरही एक आयोग युनेस्को मार्फत स्थापन करण्यात आलेला आहे. त्या मार्फत जगभराच्या अभिलेखागारांचा वापर करून 'हिस्ट्री ऑफ मॅनकाइंड' हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यात आलेला आहे.

रोमनकाळापासून युरोप मध्ये ऐतिहासिक साधनांची देखभाल व जपणूक करण्याची परंपरा चालू झाली होती. युरोपीयन समाजामध्ये सुरूवातीपासून इतिहासाविषयी जाण व समज होती. ऐतिहासिक साधनाचे महत्त्व त्यांनी सुरूवातीपासूनच ओळखले होते. इंग्लंडमध्ये १९९९ पासून महत्त्वाच्या कागदपत्राची अथवा दप्तरांची जतन करण्याची पद्धत सुरू झाली.

**भारतीय अभिलेखागार चळवळ :** भारतात इतिहासा बद्दल व इतिहासाच्या संवर्धनाबद्दल सामाजिक जाणीव नव्हती. काही ठिकाणी वैयक्तिक तर काही ठिकाणी अपवादात्मक स्थितीत कागदपत्रांचे जतन करणारी सामाजिक जाणीव आढळत होती. भारतामध्ये मध्ययुगानंतर या चळवळीचा उगम झाल्याचे दिसते. मध्ययुगामध्ये तसेच त्या आधी राजघराणे त्याची शासकीय कागदपत्रे जतन करून ठेवीत. हीच परंपरापुढे चालू राहिली. शासकीय विभागा अंतर्गत शासकीय दप्तरखाने ठेवले जात होते. प्रत्येक खात्याचे दफ्तर वेगळे ठेवले होते. इस्लामी राजवटीमध्ये हीच परंपरा पुढे चालू राहिली. भारताच्या विविध भागामध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा अमल जसजसा वाढला तसतसा दप्तरखानाही वाढला. दुसऱ्या बाजीरावाकडून १८१८ मध्ये एलफिन्स्टन याने मराठा राज्याची सूत्रे ताब्यात घेतली.

यामुळे मराठ्यांची कागदपत्रे व दप्तरखाना ही त्यांच्या ताब्यात गेला. नाना फडणीसाने मराठ्यांचे दप्तर व्यवस्थित ठेवले होते. इंग्रजांनी ठिकठिकाणी विखुरलेले मराठ्यांचे दप्तर एकत्रीत करण्यास सुरूवात केली. त्यासाठी सरदार व जहागिरदारांची मदत घेतली. दप्तरखाना चालून पाहिला. या दप्तर

खान्यातील महत्त्वाचा भाग आधीच काढून घेतला आहे. हे लक्षात आले. तरी ही सर्व कागदपत्रे साठवून ठेवून ताळेबंद केले. मिल्स या इंग्रज आधिकाऱ्याने ही कागदपत्रे साठवून ठेवून सांभाळत न बसता जाळून टाकावीत असा सल्ला मुंबई शासनास दिला. दप्तराची व्यवस्था पाहण्यासाठी खूप आर्थिक खर्च होत असल्यामुळे शासन ते करू इच्छित नव्हते. त्यावर असा तोडगा काढण्यात आला की जिल्ह्यांच्या संदर्भाची सर्व कागदपत्रे त्या त्या विभागाकडे द्यावीत. १८५९ ते ६० या काळात दप्तरांच्या याद्या तयार करण्यात आल्या. पण भारतीयांनाही दप्तरे पाहू दिली जात नव्हती. त्यामुळे भारतीयाची अस्मिता जागृत झाली. कागदपत्राची सूची प्रकाशित करावी. यासाठी चळवळ उभारण्यात आली आणि म. गो. रानाडे यांनी सरकारकडे पेशव्यांच्या रोजनिशी प्रकाशित करण्याचा आग्रह धरला. पहिल्या खंडाला विस्तृत प्रस्तावना त्यांनी लिहिली आणि मराठी जनतेला या दप्तर खान्यातील दप्तर व कागदपत्राची ओळख झाली. भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर या चळवळीस खरे स्वरूप प्राप्त झाले आणि १९९९ मध्ये भारतीय ऐतिहासिक पुराभिलेख आयोग स्थापन केला गेला. सरजदुनाथ सरकार, बी. के. ठाकूर, रशब्रुक विल्यम्स, इ. सभासदांनी अभिलेखागारे अभ्यासकांना खुली करण्याची मागणी केली. इ. स. १९२९ पासून हळू हळू सर्वत्र अभिलेखागारे भारतीयांना खुली होऊ लागली. पुढे भारतीय इतिहास परिषद स्थापन झाली आणि या चळवळीला शिस्तबद्ध वळण लागले. भारत स्वतंत्र झाल्यावर भारत सरकारने दप्तरखान्याचे जतन आणि त्याची देखभाल यावर विशेष लक्ष दिले. देशभरात प्रत्येक राज्यात आता शासकीय निमशासकीय आणि खाजगी दप्तरखाने पसरलेले आहेत. शासनाच्या अंदाज पत्रामध्ये त्याच्या खर्चाची तरतुद केलेली असते. आयोगाची दरवर्षी बैठक होते. या बैठकीत दप्तरखान्याच्या कामावर देखरेख ठेवून मार्गदर्शन केले जाते. दिल्ली येथे राष्ट्रीय अभिलेखागार ही सर्वात मोठी संस्था आहे. व त्या ठिकाणी अनेक महत्त्वाची कागदपत्रे ठेवलेली आहेत.

**१) मुंबईतील शासकीय अभिलेखागार :** १८२५ मध्ये मुंबईमध्ये गव्हर्नरचे कार्यालय सुरू झाले. माऊंट स्टअर्ट एलफिन्स्टन हा पहिला गव्हर्नर नियुक्त झाला. त्याने सुरूवातीपासून दप्तर खात्याची व्यवस्था ठेवली एलफिन्स्ट महाविद्यालयाच्या आवारातील शासकीय अभिलेखागार यातूनच उभारले आहे. या दप्तर खान्यामध्ये कंपनीची राजवट ते स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंतची कागदपत्रे व्यवस्थित जतन केली आहेत. या दप्तरखान्यातील प्रमुख

कागदपत्रांमध्ये इंग्रज काळातील व प्रशासनातील कागदपत्रे आहेत. महाराष्ट्राचा प्रमुख दप्तरखाना म्हणून महाराष्ट्र शासनाने ही त्याला मान्यता दिली आहे. या अभिलेखागारात प्रामुख्याने इंग्रजी कागदपत्रे आहेत. ही सर्व कागदपत्रे बांधून खंड व फाईल मध्ये ठेवली आहे. त्यांची संख्या ५,००,००० आहे. या कागदपत्रातून राजकीय घडामोडी व लष्करी हालचाली, शिक्षण, न्यायालयीन प्रकरणे, धार्मिक प्रकरणे, न्यायालयीन अर्थव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य, किल्ले, व्यापार, दळणवळण, उद्योग व पुरवठा अशा विविध घटकांची माहिती मिळते. मुंबईच्या शासकीय अभिलेखागाराचे शासकीय वर्गीकरण खालील प्रमाणे केले आहे.

**१) वखार व रेसिडेंन्ट चे दप्तर :** या दप्तराचे वर्गीकरण चार प्रकारे करण्यात येते.

i) १६५९-१७८६ या काळातील रोजनिश्या आणि त्यांची संख्या ५१३ आहे.

ii) मुंबईच्या ब्रिटिश कार्यालयाकडे आलेली सर्व पत्रे त्यांना **आवक** टपाल म्हटले गेले आहे. त्यांची संख्या ६४ एवढी आहे.

iii) मुंबई सरकारकडून बाहेर पाठवलेले कागदपत्रे त्यांना **जावक** टपाल म्हटले आहे. त्याचे ४३ खंड आहेत.

iv) या शिवाय वेगवेगळ्या खात्यांची कागदपत्रे १२३५ फाईल्स मध्ये ठेवली आहेत. या विभागामध्येच वखारी आणि रेसिडेन्सचा संपूर्ण पत्रव्यवहार २७ मालिकांमधून ठेवलेला आहे. या वखारींमध्ये सुरत, भडोच, करंजा, बेलापूर, बडोदा, राजपाला, रेवा, जवाहर, जंजीर, बसरा, ठाणा, कल्याण, पुणे, कोल्हापूर मोरवा, कारवार, बाणकोट इत्यादी वखारी आणि रेसीडेन्सीच्या कागदपत्रांचा समावेश आहे.

**२) सचिवालयाच्या विविध विभागाचे दप्तर :** यामध्ये ४५२९ दैनंदिन्या, ११३५ आवक, १२१६ जावक, १९५ सभावृत्तांत पुस्तिका, २,९५,६४४ फाईलिंचा समावेश आहे. हा भाग २५ मालिकांमध्ये मांडला आहे. त्यात वेगवेगळी शासकीय कागदपत्रे आहेत. सार्वजनिक बांधकाम, परकीय सबंध खाते, शेतीखाते, गोपनीय व राजकीय विभाग, पुर्नबांधणी, महसुल खाते, दुष्काळ, व्यापारी तारायंत्र, न्यायप्रशासन, विधी अर्थ पाटबंधारे ऊर्जा, धार्मिक, शिक्षण खाते, उद्योग, मजूर, किनारा, जंगल, टांकसाळ अशा विभागाची कागदपत्रे आहेत. प्रत्येक मालिकेमध्ये दैनंदिन कामकाजाचे ठराव,

आवक, जावक, सभावृत्तांत असे आहेत.

**३) किरकोळ दप्तरे :** किरकोळ दप्तरामध्ये ५८ भाग आहेत. त्यामध्ये वेगवेगळ्या विभागांचे व महत्त्वपूर्ण कागदपत्रे आहेत. मुंबईतील धान्य टंचाई गव्हर्नरचे आदेश, परकिय सत्ताविषयीचे अहवाल, गव्हर्नरचे खाजगी पुणे वकिलाची कागदपत्रे १७७५-७६ ची पार्शियन, आखाती मोहीम १७८५-८६ चा मॅलेट यांचा कलकत्ता दौरा व त्याचा वृत्तांत १७३५ ते १८३७ या काळातील भारतीय नाविक दल, गोव्याची वकिलात अबकारी कर, पुर्न आकारणी समिती, पॉवर हाऊस समितीचा अहवाल पोर्तुगीज भाषेतील १७१७ ते १७४१ च्या दप्तराचे ६ खंड रत्नागिरी दैनंदिनी, धारवाडच्या जिल्हा अधिकाऱ्याची दैनंदिनी, १६६० ते १६८९ या काळातील इंडिया ऑफिस कडून आलेल्या कागदपत्राचे १८ खंड सार्वजनिक शिक्षण खाते. दक्षिणा पुरस्कार समितीचे अहवाल, आणि उच्च न्यायालयाचे दप्तर या दप्तरामध्ये आहे.

**४) खाजगी दप्तरे :** मुंबई अभिलेखागारातील चौथ्या विभागात पूर्वीच्या राज्यकर्त्यांची दप्तरे आहेत. इंग्रजानी त्यांची राज्ये तांब्यात घेतना ही दप्तरेही हस्तगत केली. याची संख्या एकूण ३१ आहे. त्यातील रूमालाची संख्या ९११ आहे. त्यामध्ये सुमारे सव्वालाख कागदपत्रे आहे. या खाजगी दप्तरामध्ये सांवतवाडी सांगली, चांदवड, चालुक्य, धुळप, अहमदनगर, रहिमतपूरचे माने, पंतप्रतिनिधी, शिर्के, पळशीकर, कोल्हापूर - मोहिते, हेरवाडकर, पाटणकर, मेणवलीदप्तर, नाना फडणीसाचे बनारस दप्तर इत्यादीचा समावेश आहे.

**५) छापिल दप्तर :** छापील दप्तरात वृत्तपत्र, सरकारचे वार्षिक अहवाल, जयराम स्वामी प्रकाशित छापिल ग्रंथ, टाईम्स ऑफ इंडिया, दी बॉम्बे टाईम्स, लंडन गॅझेट, सिंध गॅझेट, सेन्ट जॉर्जगॅझेट, बॉम्बे क्रॉनिकल विविध प्रकारच्या विभागाचे नकाशे ऐतिहासिक नकाशे इत्यादी आहेत. या विभागामध्ये असणाऱ्या छापील कागदपत्राच्या खंडाची संख्या साडे आठ लाख आहे. मुंबई दप्तरखान्यामधील पर्शियन विभागात दुर्मिळ परंतु महत्त्वाच्या हस्तलिखिताच्या फोटोप्रती आहेत. या दप्तरातील कागदपत्रामध्ये खुतुहाते शिवाजी' 'हफ्त अजुंमन', 'महंमद आदिलशहा', 'दुसरा इब्राहिम', 'पहिला अलीआदिलशहा' फिरोजशाहा बहामनी यांची फर्माने अशी कागदपत्रे आहेत. मुंबईलेखागारात ऐतिहासिक महत्त्वाची कागदपत्रे असून स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळात त्यामधील दप्तराच्या संख्येत भर पडत गेली. या ऐतिहासिक मूल्य असणाऱ्या ठेव्याचे जतन करण्यासाठी व त्याची व्यवस्था पाहण्यासाठी एक संचालक नेमला आहे. या

विभागाच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी संचिवालय पातळीवर एक सचिवही नेमला आहे.

**२) पुण्याचे शासकीय अभिलेखागार :** पुण्याचे शासकीय अभिलेखागार **पेशवे दप्तर** या नावाने ओळखले जाते. या अभिलेखागारात मराठ्यांच्या कागदपत्राचा समृद्ध व मौल्यवान खजिना आहे. न्यायमूर्ती रानडे यानी आपल्या एका प्रस्तावनात अभिलेखागारांच्या पत्रांची ओळख करून दिली आहे. गो. स. सरदेसाई यांनी पुणे दप्तरातील कागदपत्राची ओळख करून देणारी एक मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित केली. त्यांनी पुण्याच्या पेशवे दप्तराचे ४५ खंड संपादित करून प्रकाशित केले. याशिवाय सर जदुनाथ सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली व संपादकत्वाखाली पुणे रेसिडेंटच्या कागदपत्राचे १५ खंड प्रकाशित केले आहेत. पुणे दप्तरात पेशव्यांच्या काळातील तसेच ब्रिटिश राजवटीतील कागदपत्रे आहेत. ही कागदपत्रे मराठी, इंग्रजी, गुजराती, कानडी आणि पार्शियन भाषेत आहेत. मराठी भाषेत असणारी कागदपत्रे मोडी लिपीत आहेत. पेशवे दप्तरात एकूण ४ कोटी कागदपत्रे आहेत. त्याचे ३९ हजार रूमाल तयार केले आहेत. मराठीचे २९ हजार ५००, पार्शियन ७०, गुजराती ६५०, आणि इंग्रजी १०.५०० एवढ्या कागदपत्राचे रूमाल आहेत. मराठी विभाग १२ भागात विभागला आहे. या भागांमध्ये शाहू दप्तर, पेशवे दप्तर, आंग्रे दप्तर, सातारा महाराजाचे जमाव दप्तर, कर्नाटक दप्तर सोलापूर दप्तर या शिवाय इनामा संबंधीची कागदपत्रे समाविष्ट आहेत. या सर्वांमध्ये जमावाचे रूमाल सर्वात जास्त आहेत. शाहू महाराजाचे दप्तर अवघे ५६ रूमालाचे असून १७४९ पर्यंतची कागदपत्रे त्यात सामाविष्ट आहेत. त्यानंतरच्या काळातील कागदपत्रे म्हणजेच शाहू महाराजाच्या मृत्यूपर्यंतची कागदपत्रे त्यात समाविष्ट आहेत. त्यानंतर १८६५ पर्यंतची कागदपत्रे पुणे अभिलेखागारात आहेत.

**१) शाहू महाराजाचे दप्तर :** शाहू महाराजाच्या दप्तरामध्ये असणाऱ्या कागद पत्रात रोजचे हिशोब, ग्रामीण भागाचे वृत्तांत, रोखीची हिशोब देणग्या वतन, इनाम, दानधर्म, सचिव, प्रतिनिधी, कारखानीस, सेनाकर्ते, पंतप्रधान, आज्ञा, पंडीतराव, सुंमत, सरलष्कर, अमात्य, फत्तेसिंगराव, भोसले आणि इतर सेनाधिकाऱ्यांचे अहवाल, पत्रव्यवहार किल्ल्याची व्यवस्था खाजगी कागदपत्रे सनदा मंत्र्याचे अहवाल याशिवाय किरकोळ पत्र व्यवहार आदि कागदपत्राचा समावेश होतो.

४) **पेशवा दप्तर :** पुण्याच्या शासकीय अभिलेखागारातील पेशव्यांच्या दप्तराचे आठ भाग आहेत. **त्यात रोजकिर्द पागा, घडणी प्रांत, पथके, चिटणीस, जाबसाली विखुरलेले कागद असे विभाग आहेत. रोजकिर्द म्हणजे दैनंदिन्या हूजूर रोजकिर्दीतील तीन प्रकारचे हिशोब आहेत.** जमाखर्चाच्या हिशोबाला **'पोटा'** हे नाव देऊन स्वतंत्र ठेवले आहे तर दुसरा हिशोब म्हणजे सरदार आणि स्थानिक अधिकारी यांच्या नावाने काढलेली बिले **रावत्सुदगी** होय. तर तिसरे **दप्ता** नावाचे हिशोब. या विभागात देणग्या नेमणूक पत्रे ग्रामीण व सुतांची फर्माने याचा समावेश आहे. **घडणी दप्तर** म्हणजे त्यामध्ये रोजकीर्द व दैनंदिनीची माहिती मिळते. पत्रव्यवहाराची कागदपत्रे **जाबसाली** मध्ये पाहयाला मिळतात. **प्रांत आजमास** मध्ये कागदपत्राचा अंदाज देणारी कागदपत्रे या रूमालात आहेत. पेशव्याचे केंद्रीय कार्यालय असे प्राप्त आजमांस तयार करीत. ब्रिटिशांच्या वेगवेगळ्या अधिकाऱ्याकडून मागवलेले महसूलाचे अदांज **जमाव** दप्तरात आहेत. अशा प्रकारची एकूण पाच हजार दप्तरे आहेत. **पागा दप्तरामध्ये** तबेला घोडे याचा खर्च व अन्य माहिती मिळते व **पथक** दप्तरामध्ये लष्कर पलटणी घोडदल शस्त्राचा खर्च सैन्याचा पगार या संबधीचे हिशोब आहेत. **चिटणीसी** दप्तरात सर्व कागदपत्रे राजकीय पत्र व्यवहारशी संवंधीत आहेत. तर **आंग्रे दप्तरात** आंग्रेच्या आरामारासंबंधीची सर्व कागदपत्रे एकत्र केलेली आहेत. आंग्रे दप्तरात रोजकीर्द, किनाऱ्यावरचे जिल्हे व बंदरे या संबधीची माहिती आहे. चौल, माणिकगड, रेवदंडा, सुवर्णदुर्ग, कुडाळ आणि अवचितगड, नागोठाणे या आरमारी ठाण्याचा उल्लेख आंग्रे दप्तरात दिसतो. तर **रेसिडेसी दप्तरामध्ये** साताराच्या प्रतापसिंह महाराज, शहाजी राजे यांच्या कारकिर्दीची माहिती मिळते. प्रताप सिंहाच्या या दप्तरात ग्राम अर्थव्यवस्थेचे हिशोबाचे कागद, सरंजामी भत्ते, तगाई, सीमांच्या तक्रारी, महसूल, इतर राजेराजवाड्यांचे हिशोब व वजनमापे याची माहिती या दप्तरात मिळते.

**जमाव दप्तर :** पुणे अभिलेखागारा मध्ये **जमाव दप्तर** अतिशय महत्त्वाचे आहे. पेशवाईच्या आधीची अनेक कागदपत्रे त्यात आहेत. इतर विभागा मधील कागद थोरल्या बाजीरावाच्या कारकिर्दीनंतरची आहेत. सरकारच्या विविध विभाग अधिकाऱ्यांकडून आलेले महसूला संबंधीचे अहवाल त्यात आहेत. पेशव्याच्या केंद्रीय प्रशासना कडून पाठवलेले कागद

**आजमास** विभागात आहेत. १८४३ मध्ये इनाम आयोग स्थापन केला गेला. या आयोगाकडे नागरिक तसेच ग्राम व्यवस्थेतील विविध वंश पंरपंरागत अधिकारी देशमुख, सरदेशमुख, पाटील, कुलकर्णी यांनी आपल्या कडील कागदपत्रे सादर केली. वतनदार तसेच सनदाप्राप्त अधिकारी यांनी ही आपल्याकडचा दस्तऐवज आयोगाकडे सुपुर्द केला. आयोगाकडे जमा झालेल्या कागदपत्रामध्ये सनदा, निवाडा पत्रे, मजहर, कैफियती हिंदुस्थान आणि कोकण विभागातील कागदपत्रे समाविष्ट आहेत. या कागदपत्रा मधून गावाचे हिशोब, कुंटुंबाच्या जमिनी इतर मिळकती यांचे हिशोब यांचा वृत्तांत मिळतो. ही सर्व कागदपत्रे आदय अक्षराप्रमाणे लावली आहेत. ही कागदपत्रे मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकतात. मराठा राज्याचा विस्तार दळण वळण साधने, वजनमापे वेगवेगळे कर शासकीय अधिकारपदे, सामाजिक व आर्थिक स्थिती या विषयाची त्यात माहिती मिळते. अशाच प्रकारची माहिती कर्नाटक व सोलापूर दप्तरातील रूमाल देतात. त्यामध्ये वेगवेगळ्या जिल्ह्याची माहिती जमिनदार संस्थानिक यांचे हिशोब व इतर कागदांमध्ये वैष्णव आणि वीर शैव पंथाची माहिती आहे. १९०४ मध्ये मुंबई इलाख्याच्या सर्व अधिकाऱ्यांकडून त्यांच्या ताब्यातील ब्रिटिश पूर्व काळातील सर्व कागदपत्रे दप्तरे पुण्याच्या एलिनेशन कार्यालयाकडे सुपुर्द करावी अशा सुचना दिल्या होत्या. पुणे अभिलेखागारात त्या सर्वांचा एक वेगळा विभाग आहे. तसेच दहाव्या विभागात ब्रिटिश राजवटीच्या प्रशासनाची सर्व कागदपत्रे आहेत. जमिन पाहणीचे अहवाल त्याबाबतीची कागदपत्रे दखखन कमिशनरच्या कार्यालयातील पत्रव्यवहार, सरदार संस्थानिकाकडे असणाऱ्या अहवाल, पत्रव्यवहार हिशोब तक्ते यासर्वाचे ब्रिटिश राजवटीच्या विभागात एकत्रीकरण झाले. हे सर्व कागद तत्कालीन सामाजिक आर्थिक, धार्मिक त्या बरोबर लोकजीवनाची भरपूर माहिती देतात. या कागदपत्रामधून १९ व्या शतकांच्या पश्चिम भारताच्या इतिहासाबद्दल महत्वाची माहिती मिळते. या दप्तरातील ११ व्या विभागात हक्क आयोगाच्या मराठी कागदपत्राचे रूमाल आहेत. मराठी विभागामध्ये सरदार संस्थानिक यांचे कागद आहेत. पेशव्याच्या विविध वकिला कडून आलेले अहवाल व पत्रव्यवहार **पार्शियन विभागातील** कागदपत्रामध्ये आहे. पेशव्यांनी निजाम, टिपू, आयोध्येचा नवाब आणि मोगल बादशाहाशी केलेला पर्शियन पत्रव्यवहार यात आहे.

गुजरात आणि मुंबई इलाख्याचे बरेचसे रूमाल हे **जमाव** विभागातच

आहे. गुजरामधील कागद हे गुजराती भाषेत आहेत. इंग्रजीमधील सर्व कागद हे मुंबई इलाख्याचे असून त्यांच्या १६ यादया आहेत. पहिल्या चार यादयामध्ये इनाम आयोग, पाचव्या यादीत सातारा रेसिडेन्सी, सहाव्या यादीत पुणे वकीलातीचे व्यवहार तर छापील पुस्तीके व उतारे यांची यादी सातमध्ये आहे. फोटोझिंको कार्यालया संबधी ८ वी यादी, सरदाराकडील वकिलाबाबत ९ वी यादी, दख्खन कमिशनर बाबत १० वी यादी, उत्तर प्रशासनाबाबत ११ वी यादी, १२ आणि १३ मध्ये गार्डन ग्रिफीथ या इनाम आयुक्ताची, १४ मध्ये इनाम आयोग तर १५,१६ मध्ये कोकण विभागाचे कागद आहेत.

एकूण पुणे अभिलेखागार मध्ये **पेशवा दप्तर** हे महत्त्वाचे आहे. आणि मराठ्यांच्या वैभवशाली इतिहासाबद्दल माहिती सांगणारे कागदपत्रे या दप्तरामध्ये आहेत. महाराष्ट्रात पेशवा दप्तर खुले करावे यासाठी वारंवार मागणी होऊ लागली. चळवळ उभारली गेली. या चळवळीला यश येऊन अनेक कागदपत्रे प्रकाशित व संपादित केली गेली. वाड यांनी १८९७ ते १९१४ पर्यंत १३ खंड प्रकाशित केले. पारसनिसांनी जमाव दप्तरातील सनदापत्रे, तह, करार, संरजामी यादया प्रसिद्ध केल्या. गो. स. सरदेसाई यांनी पेशवा दप्तराचे ४५ खंड संपादित व प्रकाशित केले. रत्नागिरी मालवण व इतर वकिलानीचे कागद डॉ. आर. डी. चोक्सी यांनी संशोधित व संपादित करून प्रकाशित केले व त्यावर अनेक ग्रंथ लिहिले. **पुणे अभिलेखागारातील पेशवा दप्तर हे अत्यंत महत्त्वाचे आहे.** त्यातील कागदपत्राचा उपयोग अनेक संशोधक, अभ्यासक यांनी केलेला आहे व मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक दर्जेदार ग्रंथ त्यातून निर्माण झाले.

**३) भारत इतिहास संशोधक मंडाळाचे दप्तर :** ब्रिटिश सरकारने पेशवे दप्तराचे दालन अभ्यासकांना खुले न करण्याची आडमूठी भूमिका घेतली. त्यामुळे मराठी माणूस जागा झाला. परिणामी संशोधक आणि जिज्ञासू मंडळी कामाला लागली. खाजगी व्यक्ती संस्थानिक व ऐतिहासिक घराण्याकडील कागदपत्रे गोळा करून त्याचे संपादन आणि प्रकाशित करण्याचे काम सुरू झाले. का. न. साने यांनी विष्णू शास्त्री चिंपळूकराच्या काव्य इतिहास मूधन बखरी पत्रे या यादया प्रकाशित करायला सुरूवात केली. संशोधकातून वि. का. राजवाडे यांनी त्यात अत्यंत महत्त्वाचे व मौल्यवान कार्य केले. हिंदुस्थानभर फिरून त्यांनी खाजगी दप्तरे व कागदपत्रे त्यांनी गोळा केली. त्यातूनच त्यांनी **मराठ्यांच्या इतिहासाची साधने** प्रकाशित केली. वेगवेगळ्या ठिकाणी

इतिहास संशोधन कागदपत्रे जमवण्याचे काम तसेच त्यांची जपवणूक करण्याचे काम त्यांनी केले. त्यात एकसुत्रता यावी यासाठी मेंहदळे आणि राजवाडे यांनी पुण्यामध्ये १९१० मध्ये **भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना केली.** या मंडळाच्या संग्राहालयामध्ये राजवाडे व इतर संशोधकांनी जमवलेली कागदपत्रे दप्तरे व इतर साधने आहेत. मंडळाकडे असंख्य मौल्यवान कागदपत्राचा ठेवा आहे. याशिवाय चित्र, मूर्त पत्रे, ताम्रपट, शिलालेख, दुर्मिळ ग्रंथ, नाणी आणि चित्रे अशी असंख्य साधने आहेत. मंडळामध्ये लाखोच्या संख्येने कागदपत्रे आहेत. त्यांचे रूमाल व्यवस्थित ठेवले आहेत. या रूमालाना **देणाऱ्याची** आणि **गोळा करणाऱ्या** संशोधकांची नावे दिली आहेत. ताळेबंद बेरीज शिल्लक यासारखी जमाखर्चाचे कागद त्यात आहेत. **ओतुरकरांनी** गोळा केलेल्या दप्तरात संगमनेरच्या कोकीळ कुंटुबा कडील मोडी आणि पर्शियन भाषेतील कागदपत्रे आहेत. ग्वाल्हेरच्या शिंद्याच्या सैन्या बाबतचे हिशोब व अन्य महत्त्वपूर्ण माहिती असणारे कागदपत्रे **काळे व दाभोलकर** रूमालात आहेत. काही अस्सल पार्शियन कागद **द. वि. आपटे** यांनी जमावलेल्या १२ रूमालात आहेत. या दप्तरामध्ये शिवकाळातील मझहर आणि खर्ड्याच्या बखरीची मोडी भाषेतील एक प्रत आहे. **चाफेकर दप्तरामध्ये** हिशोबाचे तक्ते आहेत. या रूमाला मध्ये सावकारी करणाऱ्या चिपळूकर कुटुंबाचे हिशोब व न्याय निवाड्याचे कागदपत्रे आहेत. चाकणच्या ब्रम्हे कुंटुबाचे ही कागद अशाच प्रकारचे आहेत. **मेंहदळे दप्तरात** शकावल्या, तक्रारी, रामदास स्वामीचे हनुमान स्वामी बखर व भाऊसाहेबाच्या बखरीतील काही भाग असे अनेक कागद पत्रे भारत इतिहास संशोधक मंडळाकडे आहेत. **केळकर** यांच्या दप्तरांत स्वामी चिदंबर दिक्षीत आणि बापू गोखले यांच्यातील पत्रव्यवहार आहे. तसेच **अलाहाबादकर दप्तर, साने दप्तर** याशिवाय **चित्रे दप्तर** या मंडळात आहेत. **चंद्रचुडाचे दप्तर** हे मंडळातील सर्व दप्तरात मोठे आहे. त्यात सुमारे ३० हजार कागद आहेत. मराठ्यांच्या उत्तरेकडील राजकरणा संबधी माहिती त्यात आहे. तसेच **तुळशीबागवाले दप्तर** ही खूप मोठे आहे. त्यात ५० हजार पेक्षा अधिक कागदपत्रे आहे. रोजचे हिशोब, खाजगी दैनंदिन्या, रोजकिर्द अशी कागदपत्रे त्यात आहे. **मंडळाकडे असणारा संग्रह खाजगी दप्तरखान्यापैकी भारतात सर्वात मोठा मानला जातो.**

**४) डेक्कन कॉलेज मधील संग्रहालय व अभिलेखागार :** ब्रिटिशांच्या

कालखंडात स्थापन करण्यात आलेले हे महाविद्यालय अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. आज ते पुरातत्व विद्या, प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृतीचे प्रगत अध्ययन केंद्र आहे. तेथेच एक मराठ्यांच्या इतिहासाचे संग्रहालय व प्तरखानाही आहे. पुण्याबाहेर आळंदी रस्त्यावर हे कॉलेज उभे आहे. १८६९ मध्ये किर्तने यांनी प्रथम ग्रॅड डफच्या मराठ्यांच्या इतिहासावर टिका करणारा शोध निबंध येथेच प्रथम वाचला होता. १९२५ मध्ये सातार्‍यात रा. ब पारसनीस यांनी जमवलेला दप्तरखाना व संग्रहालय ठिकाणी केंद्रीत करून त्याचे पारसनीस दप्तरात रूपांतर केले गेले. हळुहळु त्यामध्ये भर पडत जाऊन आकाराने तो प्रचंड बनला. तो संग्रह पुढे शासनाने विकत घेतला व पुण्यास डेक्कन कॉलेजमध्ये आणून ठेवला. या संग्रहात १०१ मोडी कागद पत्रांचे रूमाल आहेत. त्यात १७५० ते १८५० या काळातील कागदपत्रे आहेत. विविध भाषातील भुर्जपत्रे, हस्तलिखिते, दान दर्शविणारे ताम्रपट, दुर्मिळ ग्रंथ नकाशे आराखडे, चित्रे, मायक्रोफिल्म, फोटो स्टॅट प्रती असा अमूल्य ठेवा यात आहे. मोडी कागद पत्रामध्ये नाना फडणीसाच्या मेणवली येथील दप्तरांचा समावेश आहे. त्यामध्ये धावडशी आणि ग्वाल्हेर येथील पत्रव्यवहारांचा संग्रह आहे. पारसनीसांनी जमविलेल्या मेणवली दप्तराचे तीन वेगवेगळे संग्रह झालेले आहे ते डेक्कन कॉलेज (पुणे) मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद) मुंबईचे शासकीय अभिलेखागार येथे आहे.

डेक्कन कॉलेजातील पुराभिलेखाअभिलेखागारात २५,००० कागद असून त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे.

१. छत्रपतीचे ४० व पेशव्यांचे १५०० कागद
२. पेशवे दरबारातील इतर सरदारांचे १२,००० कागद
३. हैद्राबादच्या निजामाशी झालेल्या पत्रव्यवहाराचे ४००० कागद
४. म्हैसूरच्या हैदर अली टिपूबरोबरील पत्रव्यवहाराचे ३०० कागद
५. पोर्तुगीज, फ्रेंच आणि ब्रिटिश या परकिय सत्तांशी झालेल्या पत्रव्यवहाराचे ९०० कागद
६. हिंगण्याबरोबर झालेल्या पत्रव्यवहाराचे ७५० कागद
७. खर्ड्यांच्या लढाईचे ६५० कागद
८. कित्तुरची लढाई जंजिरा, मोहिम, व पहिल्या इंग्रज-मराठा युद्धा संबंधी १२,००० हुन जास्त अस्सल कागद
९. सातारकर छत्रपती प्रतापसिंह महाराज, दौलतराव शिंदे, हरिपंत फडके,

नागपुरचा दुसरा रघुजी भोसले, चार्लस मॅलेट इत्यादीचा पत्रव्यवहार इतर कागदांमध्ये आहे.

१०. याखेरीज दळणवळणाची साधने, गुलामांची खरेदी विक्री, वेठ बिगार पद्धती, ग्रामीण समाजजीवन धान्य व इतर वस्तुंचे बाजारभाव, कर, खरेदी-विक्रीचे कागद, शासकीय खर्चाचे हिशोब, नाना फडणीसांचा खाजगी हिशोब जनार्दन बाबांचे सावकरी व्यवहार किबे कुंटुबाच्या सावकरीच्या कागदपत्रांचाही या कागदपत्रामध्ये समावेश आहे.

डेक्कन कॉलेजातील दप्तरखान्यात काही घराण्याची खाजगी कागदपत्रे आहेत. त्यामध्ये चिटणीस, केसकर मोहिते, घाटगे, निंबाळकर, खेमकर, सावंत, महाडिक, प्रतिनिधी, देशमुख, होळकर, नागपूरकर, भोसले, रायरीकर, शिवापूरचे देशपांडे, बिवल्कर, नेवाळकर, जिन्सीवाले, जगताप, नंदुरबारचे देसाई, निपाणीच्या देसाई घराण्यांच्या कागदपत्राचा यात समावेश आहे. तसेच रा. ब. पारसनीसांनी लंडनहुन मिळविले कागदपत्र तसेच मॅकरटनच्या कागदपत्रात त्याच्या मद्रासमधील १७८० ते ८५ या काळातील गव्हर्नर कारकिंदीचा पत्रव्यवहार यांचा समावेश आहे. डेक्कन कॉलेजमध्ये १८ पर्शियन आणि उर्दु, हस्तलिखिते असून त्यामध्ये बाबरपासून जहागिरपर्यंतच्या मोगल बादशाहाच्या कारकिदीच्या आढावा घेणारे, इकबालनामा-ए-जहांगिरी योगवशिष्ठाचे दाराशुकोने केलेले पर्शियन भाषांतर अब्दुल समद यांनी केलेला अबुलफझलच्या खाजगी आणि सरकारी पत्रव्यवहारांचा संग्रह अबुलफझल आणि मुन्शी सुजन रे कायथ (पतियाळा) यांनी लिहलेला भारताचा इतिहास ऐने अकबरी, मिरत- ऐ-सिकंदरी व भूपती किरत हे सुरदासांचे कृष्णभक्तीपर हिंदी काव्य आहे. डेक्कन कॉलेजमध्ये ७ भुर्जपत्रे असून २ नंदनी नागरी, ३ मल्याळम, २ नागरी लिपीतील आहेत. डेक्कन कॉलेजध्ये ३ ताम्रपट असून ते चालुक्य राजा विक्रम विजयादित्य (इ.स. ७१०), कदंब रविवर्मन (६ वे शतक) आणि राष्ट्रकुट राजा दंतिदुर्ग (इ.स. १०५७) यांनी लिहीलेले आहेत. ४० दुर्मिळ ग्रंथामध्ये २१ इंग्लिश, ५ पोर्तुगीज, ४ फ्रेंच, डच २, पार्शियन व मराठी १, १ लॅटीन भाषेतील असून ते प्रवास वर्णनपर भौगोलिक नकाशे चरित्र्य शब्दकोश काव्ये इत्यादींवर आहेत. डेक्कन कॉलेजमध्ये ५० नकाशे असून ते युद्धाची व्यूहरचना दाखविणारे आहेत. ते खर्डा, श्रीरंगपट्टम, तळेगाव, वॉटरलू या लढायांचे असून इतरांमध्ये मोगल साम्राज्याचा विस्तार (इ.स. १६५४)

कलकत्ता मद्रास, मुंबई, प्लासीची लढाई व इतर परकीय देशांबद्दलचे आहेत. डेक्कन कॉलेजच्या चित्रसंग्रहामध्ये फोर्ट विल्यम वखार, तापी तीरावरून दिसणारे सुरत शहर, श्रीरंगपट्टणची लढाई, नागपूर, बेंगलोर व मुंबई शहरांची चित्रे आहेत. मायक्रो फिल्समध्ये अनेक दुर्मिळ मोडी-पर्शियन कागदपत्रे आहेत. फोटोस्टॅट प्रतीमध्ये 'खुतुहाते शिवाजी' ह्या दुर्मिळ हस्तलिखिताची एक प्रत मुळावरून काढलेली आहे.

**इतर दप्तरखाने :**

**५) वि.का. राजवाडे अभिलेखागार -** वि.का. राजवाडे यांनी आपल्या मृत्यूपूर्वी पुणे सोडून ते धुळ्याला 'भटट' यांच्याकडे जाऊन स्थायिक झाले होते. त्यांच्या मृत्यूनंतर धुळ्याला त्यांच्या सर्व कागदपत्रांचे अभिलेखागार निर्माण करण्यात येऊन त्यांच्या स्मरणार्थ या संशोधन मंदिराची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये कागदपत्रे, वस्तु, पोथ्या, मूर्ती, पुस्तके यांचा मोठा संग्रह विकसित होऊन एक संपन्न, समृद्ध असा खजिना तयार झालेला असून २४० संस्कृत पर्शियन मोडी, रूमाल तेथे आहेत. **मराठ्यांच्या इतिहासाची साधने** या ग्रंथासाठी जमवलेली अनेक कागदपत्रे, **राजवाडे संग्रह** म्हणून सहा स्वतंत्र रूमालातून ठेवलेली आहेत. समर्थ वाग्देवता मंदिराच्या संग्रहालयात समर्थ रामदासांच्या संदर्भातील अनेक कागदपत्रे आहेत. संत मंहताच्या संदर्भातील दुर्मिळ ग्रंथ ही त्यात आहेत. सतकार्योत्तेजेक सभेच्या सौजन्याने प्रकाशित झालेले 'श्री. रामदासी संशोधना'चे चार खंड असून त्यातून त्यांच्या संग्रहाची सविस्तर माहिती त्यात दिलेली आहे.

**६) कोल्हापूर अभिलेखागार -** महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या विभागात जी अभिलेखागारे आहेत. त्यामधील प्रमुख म्हणजे कोल्हापूर अभिलेखागार होय. ७,५०० कागदपत्रांचे हे अभिलेखागार १२ वेगवेगळ्या दप्तरामध्ये विभागण्यात आले आहे. **हुजुर खाजगी** रूमालात छत्रपतींचे खाजगी हिशोब, जमाखर्च, तक्ते व अठरा कारखान्यांची कागदपत्रे आहेत. **जमेनिशी** रूमालात राज्याच्या हिशोबाची सविस्तर कागदपत्रे आहेत. राज्याचा खजिना व त्यातून होणारे सर्व आर्थिक व्यवहार हूजुर खजिन्यांमध्ये पहावयास सापडतात. किल्ले आणि पागा, पारसनिस - निवडी - चिटणीशी, कैफियती, पेठा आणि हुजुर दप्ता, रावसुदगी, जमाबंदी, हैदर निजाम, टिपू व इतर मुस्लीम राज्यकर्त्यांशी झालेला पर्शियन पत्रव्यवहार छत्रपतीचा १९०५ पासूनच पत्रव्यवहार व इतर किरकोळ कागदे असे त्यांचे विविध विभाग आहेत. इतर दप्तरामध्ये

**राजर्षी शाहू, छ. राजाराम, मिरजेचे पटवर्धन, कुंरूदवाड, कागल, गगनबावडा, तोरगळ, कागलची थोरली तसेच धाकटी पाती (भाऊ) सरलष्कर, हिम्मत बहादूर व गुरू महाराज दप्तरांचा प्रामुख्याने समावेश आहे. संस्थानाच्या वकिलातीचे दप्तर** हे स्वतंत्र ठेवलेले असून त्याचप्रमाणे इतर ही काही महत्त्वाची प्रकरणे व त्या संबधीची कागदपत्रे स्वतंत्र दप्तरातुन आहेत. राजवाड्यातील क्रांती, गडकऱ्यांचे उठाव, तुरूंग, रेल्वे, जंगल, इनामपत्रके व कुळासंबधीचे कागद यात महत्त्वाचे आहेत.

**७) विदर्भ अभिलेखागार :** दुसरे सुप्रसिद्ध अभिलेखागार विदर्भ येथे आहेत. त्यामध्ये नागपूरच्या रेसिडेन्सीचे पत्रव्यवहार, सचिवालयातील कागदपत्रे, जबलपूर विभागाची दप्तरे, छत्तीसगड व अलाहाबाद विभागाची कागदपत्रे आहेत. त्यामध्ये मोडी, पर्शियन, उर्दू कागदांचा भरणा आहे. नागपुरकर भोसल्याची कागदपत्रेही येथेच आहेत. त्यामध्ये मोडी पर्शियन उर्दू कागदांचा भरणा आहे. याखेरील विदर्भ अभिलेखागरात आडेगावकर, देशापांडे, संस्कृत हस्तलिखिते, छत्ती संग्रहाचे कागदपत्र अमरावतीच्या जिल्हा न्यायालयाची कागदपत्रे नागपूर जिल्हाधिकारी कचेरीतील तसेच सुभेदारांचे कागद असून २०० नकाशे ही आहेत.

**८) इतर अभिलेखागारे :** वरील अभिलेखागारांखेरीज महाराष्ट्रात औंध वस्तुसंग्रहालच व अभिलेखागार, अहमदनगरचे वस्तुसंग्रहालय मराठवाड्यातील इतिहास संग्रहालय आणि नांदेडचे गोदातीर इतिहास संशोधन मंडळ हे महत्त्वाचे आहे.

**सारांश :** अभिलेखागारहेही ब्रिटिश काळापासून विकसित झालेली एक रचनात्मक चळवळ आहे. ब्रिटीशांनी ही कागदपत्रे व दप्तरे अभ्यासकांना पाहण्यास संशोधनास उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे एक प्रकारचा असंतोष व कडवटपणा निर्माण झाला त्यातून जे आंदोलन उभारले गेले. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहास संशोधनास प्रचंड चालना मिळाली. महाराष्ट्रात शासकीय तसेच खाजगी स्वरूपाची अनेक अभिलेखागारे व वस्तु संग्रहालय आहेत. त्यातून पेशवा काळ व ब्रिटिश वसाहत काळ यांची मुबलक कागदपत्रे व अन्य साधने संग्रहित करण्यात आलेली आहेत. त्यातील बहुसंख्य कागदपत्रे मोडी, मराठी, इंग्रजी, पर्शियन, उर्दू, गुजराती, पोर्तुगीज, फ्रेंच, डच इत्यादी भाषेतील आहेत. महाराष्ट्रात जी प्रमुख वस्तु संग्रहालये व अभिलेखागारे आहेत. त्यातून पश्चिम भारताच्या इतिहासावरती प्रकाश पडतो.

महाराष्ट्रातील प्रमुख अभिलेखागारांमध्ये मुंबईचे शासकीय अभिलेखागार पुण्याचे पेशवे दप्तर, कोल्हापूर व विदर्भातील दप्तरखाने, डेक्कन कॉलेजातील वस्तुसंग्रहालय व दप्तरखाने प्रमुख आहेत. खाजगी अभिलेखागारांमध्ये पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे दप्तर हे अत्यंत मौल्यवान गणले जाते. त्याच्या जोडीला धुळ्याचे राजवाडे संशोधन मंडळ, नगरचे ऐतिहासिक संशोधन मंडळ, नांदेडचे गोदातीर मंडळ ही प्रमुख वस्तुसंग्रहालये आणि दप्तरे आहेत.

**संदर्भ साधनांचे महत्त्व :**

विविध संदर्भ साधनाचा आपण इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून विचार केला आहे. प्रत्येक संदर्भ साधनाचे महत्त्व वेगवेगळ्या स्वरूपाचे आहे. संदर्भ साधनांच्या आधारेच इतिहास लिहिला जातो. हा इतिहास जास्तीत जास्त यथार्थ सत्याप्रत जाणारा तत्कालीन सामाजिक राजकीय आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक माहिती परिपूर्णरित्या देणारा असावा असाच इतिहास संशोधक लेखक यांचा दावा आहे. इतिहास म्हणजे ऐतिहासिक काळाचे घटनाचे निव्वळ मनोरंजक कथाकथन नव्हे, तर इतिहासात घडून गेलेल्या गोष्टी यथार्थ स्वरूपात मांडून त्यांचे मार्गदर्शन येणाऱ्या भावी काळाला झाले पाहिजे. हा किमान हेतू इतिहास लेखनाचा आपण स्विकारला आहे. इतिहासाचे लिखाण हे संदर्भ साधनांच्या वतीने परीपूर्ण होते. त्याला पुराव्याचा जोर असतो. कोणत्याही गोष्टीची चिकित्सक टिका टिप्पणी करण्यासाठी आपल्याला साधनाचा उपयोग करता येतो. इतिहास लेखन हे काही कल्पना रंगवण्याचा विषय नाही त्याला एक वेगळा आशय आहे. म्हणून संदर्भ साधने मग ती प्राथमिक असो या दुय्यम ती इतिहास लेखनाचा प्राण म्हणून आपण तो स्विकारला आहे. प्रत्येक संदर्भ साधनांचे महत्त्व त्याच्या वर्गवारी वरून संशोधक करीत असतो. सध्याच्या आधुनिक काळात शास्त्रीय चिकित्सेला खूप महत्त्व आल्यामुळे संदर्भ साधनांतील चिकित्सा कठोर बनली आहे.

कुचकामी, अर्थहीन व अनावश्यक साधने पुष्कळ सापडतात. त्यांना आता इतिहासात स्थान नाही. जेवढा-जेवढा संदर्भ साधनाचा जास्तीत जास्त बारकाईने अभ्यास केला जाईल. तेवढा आपण इतिहासाच्या सत्याचा शोध घेऊ शकू आणि म्हणून संदर्भसाधनांचा इतिहास लेखनाच्या दृष्टीने फार मोलाचा वाटा आहे. आधुनिक काळातील म्हणजे विसाव्या शतकातील इतिहास लिहिताना प्रचंड संदर्भ साधने अगदी दृक श्राव्य साधने देखील उपलब्ध आहेत.

पुराव्यांच्या साधनांचा अगदी जोरदार मारा संशोधकांवर अभ्यासकांवर होणार आहे. पण त्यातले निखळ चिरकाल टिकणारे साधन संशोधनासाठी शेवटपर्यंत उपलब्ध राहणार आहे. सत्याचा शोध घेणे, इतिहास कालीन घटनाचा वेध घेणे. हा मानवी स्वभावाचा भागच बनला आहे. नवे शोध, नवे तंत्र, नवे ज्ञान, नवी अनुभूती यासाठी मानवाची अखंड धडपड चालू आहे व ती चालूच राहणार आहे. म्हणून ज्ञान साधनेला आणि तिच्या शोधाला अंत नाही. शेवटी रॅंके हा इतिहासकार म्हणतो तेच खरे " No documents, No history" म्हणजेच संदर्भ साधन नसतील तर इतिहास असणार नाही, यामुळे इतिहास लेखन प्रक्रियेत साधने ही अत्यंत महत्त्वाची आहेत. त्याशिवाय इतिहास लेखनपूर्णच होऊ शकत नाही.

❐

# ३ ऐतिहासीक संशोधनाची साधने

३.१ साधनांचे प्रकार

अ) प्राथमिक साधने - दुय्यम साधने.

ब) लिखीत आणि अलिखीत साधने

३.२ साधनांची उपलब्धता

३.३ साधनांचे महत्व

**संशोधन** Research

संशोधन म्हणजे पुन्हा पुन्हा शोध घेणे. ही सतत चालणारी प्रक्रिया असते. नव्याने कागदपत्र उपलब्ध होतात. संशोधनाचा अन्वयार्थ स्वरूप बदलत जाते. काळानुरूप माहिती, तंत्रज्ञानाच्या झालेल्या विकासामुळे ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे.

''ज्या कागदपत्रांच्या साह्याने ऐतिहासिक लेखन केले जाते. तत्कालीन घटनांवर प्रकाश टाकला जातो. त्याला **'ऐतिहासिक' साधने** असे म्हणतात'' इतिहासाची साधने सुद्धा काळानुरूप विकसीत झालेली आहेत. फक्त ऐतिहासिक संशोधनामध्ये मुख्य अडचण येते ती म्हणजे भाषेची. म्हणून संशोधक हा बहुभाषिक असावा अशी अपेक्षा केली जाते.

आधुनिक काळामध्ये इतिहास लेखन शास्त्रशुद्ध केले जावे अशी गरज निर्माण झाली आहे. इतिहासाची विश्वसनीयता जपण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने लेखन करणे आवश्यक झाले आहे. मानवी जीवन व्यतीत करत असतांना संदर्भ साधनांची गरज असते. मागोवा घ्यावा लागतो. हे संदर्भ इतिहासात सापडतात. म्हणून कागदपत्राशिवाय. इतिहास नाही असे म्हटले जाते. कथा, कादंबरी आख्यायिका याला वाङमयीन सौंदर्याचा मुलामा दिलेला असतो. यामुळे ते लेखन विश्वसनीय होत नाही. लेखकांची प्रतिभा आणि 'प्रतिमा' याचे प्रतिबिंब लेखनावर पडलेले दिसते. इतिहास लेखनात fact म्हणजे सत्याच्या पातळीवर तपासून पाहिलेली घटना व त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. फक्त घटना शोधून काढणे व त्यावर भाष्य करणे एवढेच कर्तव्य इतिहास लेखनात अभिप्रेत नाही. इतिहासकाराला न्यायाधिशाची भूमिका करावी लागते, वकीलाची नाही.

ऐतिहासिक संशोधनाचा प्रवास दुय्यम साधनांकडून प्राथमीक साधनांकडे